


# उच्चतर चेतना


## अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

मे २०२५

वर्ष ५० अंक ०५



श्रीअरविंद

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---

**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१

**चिंतनार्थ...**

श्रीमाताजींची शांती तुमच्या ऊर्ध्वस्थित असते. अभीप्सा आणि अविचल आत्म–उन्मुखता यांद्वारे साधकामध्ये तिचे अवतरण होते. जेव्हा ती शांती व्यक्तीच्या प्राणाचा व शरीराचा ताबा घेते, तेव्हा समचित्तता काहीशी सुकर होते आणि सरतेशेवटी ती आपोआप प्रस्थापित होते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 135-136)

*

# उच्चतर चेतना

संपादकीय..........................................................०२
योगजीवनाची पूर्वतयारी............................................०३
पूर्णयोगांतर्गत योगसाधना ..........................................२०
उच्चतर शक्तीचे अवतरण..........................................३२

---

## संपादकीय

मन हा या सृष्टीच्या निर्मितीमधील शेवटचा टप्पा नाही किंवा मानवी शक्यतेचा देखील तो शेवटचा टप्पा नाही. मानवी मन आज वैचारिक मनाच्या टप्प्यापर्यंत येऊन पोहोचले आहे. उच्च मन, प्रकाशित मन, अंतःस्फूर्त मन, अधिमानस येथपर्यंत मनुष्य जाऊन पोहोचू शकतो, अतिमानस–चेतना आणि तिचे अवतरण हे देखील आता शक्यतेच्या टप्प्यात आलेले आहे. पण व्यापक जनसमूहाला त्याचा लाभ व्हायचा असेल तर, मनुष्याने उच्चतर चेतनेच्या पातळ्यांवर चढून जाणे आणि त्या चेतनेचे पृथ्वी–चेतनेमध्ये अवतरण होणे या गोष्टी आवश्यक आहेत. उच्चतर चेतनेचे मानवी चेतनेवर जे कार्य चालते त्यातील काही पैलूंना 'अभीप्सा' मासिकाच्या या अंकामध्ये स्पर्श करण्यात आलेला आहे.

संपादक, अभीप्सा मासिक

**

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

---

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# योगजीवनाची पूर्वतयारी

## चिंताग्रस्त जीवन आणि त्यावरील उपाय

मनुष्याकडे जीवन जगत असतानाच स्वतःचे निरीक्षण करण्याची मानसिक क्षमता असल्यामुळे तो इतरांपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण ठरतो, हे अगदी उघड आहे. प्राणी आपसूक, सहजस्वाभाविकपणे जीवन जगत असतात. एखाद्या प्राण्याला अपघातामुळे किंवा आजारपणामुळे जरी पीडा सहन करावी लागली तरी, ती पीडा अगदी किमान असते. कारण तो प्राणी त्या दुःखाचे निरीक्षण करू शकत नाही किंवा तो स्वतःच्या चेतनेमध्ये त्याचे प्रक्षेपण करू शकत नाही किंवा त्यामुळे पुढे काय होईल याची चिंता तो करत बसत नाही. त्याला झालेल्या अपघाताविषयी किंवा आलेल्या आजारपणाविषयी तो कोणतेही तर्कवितर्क करू शकत नाही. आणि एखाद्या प्राण्याने समजा जीवन जगत असताना स्वतःचे निरीक्षण केलेच तरी, ते नक्कीच अगदी एखाद–दुसरा क्षण इतके किंवा अगदी नगण्य प्रमाणात असणार. आणि म्हणूनच प्राण्यांना कोणतीही चिंता भेडसावत नाही आणि ते शांतपणे जीवन जगू शकतात.

मनुष्याच्या जन्माबरोबरच 'उद्या काय होणार आहे,' याची एक अखंड चिंता उदयाला आली आहे. ही चिंता हे त्याच्या दुःखकष्टाचे एकमेव कारण नसले तरी एक मुख्य कारण असते. स्वतःकडे वेगळे होऊन पाहता येण्याच्या या चेतनेमुळे मनुष्यामध्ये हुरहूर, दुःखदायक कल्पना, चिंता, त्रास, भविष्यात येऊ शकतील अशा संकटांची चाहूल या गोष्टी सुरू झाल्या आहेत. आणि त्याचा परिणाम म्हणून बहुतांशी माणसं, (म्हणजे कमी सचेत माणसंच नव्हेत तर अतिशय सचेत असणारी माणसंदेखील) कायमच चिंताग्रस्त होऊन जीवन जगत असतात.

मनुष्य एकीकडे इतका सचेत (conscious) आहे की, तो या सगळ्यापासून अलिप्त राहू शकत नाही आणि दुसरीकडे, उद्या काय

घडून येणार आहे हे त्याला (निश्चितपणे) ज्ञात होईल, इतकाही तो सचेत नाही. खरोखर, पृथ्वीवरच्या सर्व प्राणिमात्रांमध्ये मनुष्य हा सर्वात दुःखीकष्टी प्राणी आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. मनुष्याला त्याच्या अशा असण्याची सवय झाली आहे; कारण त्याची ही जी जगावेगळी अवस्था आहे ती त्याला त्याच्या पूर्वजांकडून वारसारूपानेच मिळालेली आहे. खरोखरच ही अतिशय दयनीय अवस्था आहे. (परंतु मनुष्याला एक क्षमता प्रदान करण्यात आलेली आहे.)

उच्चतर स्तरावर आरोहण करण्याची आणि प्राण्यामधील अचेतनेची जागा आध्यात्मिक अतिचेतनेद्वारे घेतली जाण्याची आध्यात्मिक क्षमता मनुष्याकडे आहे. आणि या क्षमतेमुळे, स्वतःच्या अस्तित्वाचे प्रयोजन काय आहे आणि त्याने केलेल्या प्रयत्नांची परिणती कशामध्ये होणार आहे हे भविष्यवेधी दृष्टीने पाहण्याची क्षमता त्याच्यामध्ये आली आहे. एवढेच नव्हे तर, त्याच्यामध्ये उच्चतर आध्यात्मिक शक्तीवर विचक्षण विश्वास ठेवण्याची क्षमतादेखील निर्माण झाली आहे. त्या आध्यात्मिक शक्तीप्रत तो स्वतःच्या समग्र अस्तित्वानिशी समर्पित होऊ शकतो. त्या शक्तीवर विसंबून, तो स्वतःच्या जीवनाची आणि भविष्याची सर्व जबाबदारी तिच्यावर सोपवू शकतो आणि सर्व प्रकारच्या काळज्या, चिंता यांपासून तो मुक्त होऊ शकतो.

अर्थातच आता यापुढे, मनुष्याचे पतन होऊन तो पुन्हा प्राण्याच्या पातळीवर खाली घसरेल आणि त्याने संपादन केलेली चेतना तो गमावून बसेल हे शक्य नाही. आणि म्हणून, त्याच्यापाशी एकच उपाय शिल्लक राहतो; तो ज्या दयनीय परिस्थितीत जीवन जगत आहे त्या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा एकच मार्ग त्याच्यापाशी उरतो. जेथे चिंतेची जागा विश्वासपूर्ण समर्पणाने घेतलेली असते आणि जेथे प्रकाशमान परिणतीची खात्री असते अशा एका उच्चतर स्थितीमध्ये उन्नत होणे, म्हणजे चेतनेमध्ये परिवर्तन घडवून आणणे हाच तो एकमेव मार्ग

त्याच्यापाशी शिल्लक आहे. खरे सांगायचे तर, (चिंताग्रस्ततेचा) हा प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक असणारे असे एखादे मार्गदर्शक सूत्र त्याच्या हाती नाही. म्हणजे ज्याची किल्लीच आपल्यापाशी नाही अशा गोष्टीसाठी आपण जबाबदार असणे, यासारखी दुसरी दयनीय अवस्था नाही.

प्राण्यांना कोणतेही प्रश्न पडत नाहीत, ते नुसते जगत असतात. ते उपजत प्रेरणेनुसार जीवन जगत असतात. ते त्यांच्या सामूहिक चेतनेवर विसंबून असतात, या चेतनेकडे उपजत ज्ञान असते. आणि ही सामूहिक चेतना प्राण्यांच्या व्यक्तिगत चेतनेपेक्षा अधिक उन्नत असते. पण ती स्वयंचलित, सहजस्वाभाविक असते. कोणता एखादा संकल्प करण्याची किंवा तो प्रत्यक्षात आणण्यासाठी काही प्रयत्न करण्याची तिला आवश्यकता नसते. ही चेतना स्वाभाविकपणे तशीच असते आणि ती त्या प्राण्यांच्या जीवनासाठी जबाबदार नसल्यामुळे ती कोणतीही काळजी करत बसत नाही.

स्वतःवर अवलंबून राहण्याची जाणीव ही मनुष्याच्या जन्माबरोबर उदयास आली आहे; मात्र त्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान त्याच्यापाशी नसल्यामुळे, कायमस्वरूपी चिंता त्याच्या वाट्याला आलेली आहे. मनुष्य जर त्याच्या स्वतःच्या चेतनेपेक्षा अधिक उच्च असणाऱ्या चेतनेप्रत पूर्णपणे समर्पित होऊ शकला, म्हणजे त्याने स्वतःला जर त्या चेतनेच्या हाती सोपविले आणि त्याच्या काळज्या, चिंता त्या चेतनेच्या हाती सोपविल्या, तसेच स्वतःच्या जीवनाचे मार्गदर्शन करण्याची व सर्व गोष्टींची सुव्यवस्था लावण्याची जबाबदारी त्याने जर त्या चेतनेच्या हाती सोपविली तरच या चिंता संपुष्टात येऊ शकतील.

एखादा प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान जर एखाद्या व्यक्तीकडे नसेलच तर, ती व्यक्ती तो प्रश्न सोडवणार तरी कसा? आणि दुर्दैवाची गोष्ट अशी की, मनुष्याला वाटते की, त्याच्या जीवनाचे सर्व प्रश्न त्याने स्वतःच सोडविले पाहिजेत. मात्र तसे करण्यासाठी

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# श्रद्धेचे सामर्थ्य

राघवाम्मा यांचा जन्म हैदराबाद संस्थानच्या अखत्यारीतील एका खेडेगावात झाला. एकदा त्यांच्या वडिलांच्या वाचनात श्रीअरविंदांचे 'द मदर' हे पुस्तक आले. त्या पुस्तकाने प्रभावित होऊन ते व त्यांचे कुटुंबीय पाँडिचेरी येथे कायमचे वास्तव्यास आले. राघवाम्मा तेव्हा अवघ्या दहा वर्षांच्या होत्या. त्या 'श्रीअरविंद इंटरनॅशनल सेंटर ऑफ एज्युकेशन'मध्ये शिकू लागल्या. श्रीमाताजींनी त्यांना 'निरता' असे नाव दिले. ईश्वराप्रति निष्ठावान भक्ती आणि सरळपणा असा 'निरता' या शब्दाचा अर्थ आहे.

त्यांनी एकदा श्रीमाताजींना असे लिहिले की, ''तुम्ही कायम माझ्या सोबत राहाल ना ?'' तेव्हा श्रीमाताजींनी त्यांना एका कार्डावर लिहून दिले की, ''निरता, मी ईश्वर–साक्षात्काराच्या मार्गावर तुला मार्गदर्शन करत आहे.''

पुढे कधीतरी एकदा त्यांनी श्रीमाताजींना लिहिले की, ''बरेचदा असे होते, मी खूप उत्कटतेने तुमचा धावा करत असते, तुमचा विचार करत असते पण माझे हृदय मात्र कोरडे असते. मी माझ्या वैयक्तिक प्रयत्नांनी काहीच करू शकत नाही, असे मला जाणवत आहे.'' तेव्हा श्रीमाताजींनी त्यांना उत्तर दिले, ''मी नेहमीच तुझ्यासोबत असते. तुझी हाक माझ्यापर्यंत पोहोचते, पण मला वाटते की, तू मला अति–सक्रिय मनाने आवाहन करतेस. त्याऐवजी, विचारविरहित होत, मला अगदी अंतःकरणपूर्वक हाक मारत जा. प्रयत्न कर, मी तुला साहाय्य करेन.''

असेच आणखी एकदा निरता खूप निराश, हताश झाल्या होत्या. तेव्हा श्रीमाताजी त्यांना म्हणाल्या, ''बाळा, डोळे मिटून घे आणि माँ, माँ, माँ असा धावा कर. मी येईन आणि तुझ्या धमन्यांमधून वाहत राहीन.''

पुढे निरता यांना त्यांच्या जीवनात काही बिकट प्रसंगांना सामोरे जावे लागले. त्यांच्या मनात वाईट विचार गर्दी करत असत. श्रीमाताजींनी त्यांना जवळ घेतले आणि सांत्वन करत त्या म्हणाल्या, ''बेटा, काळजी करू नकोस, काही वाईट होणार नाही. श्रद्धा बाळग.''

श्रीमाताजींविषयीच्या अपार श्रद्धेमुळे, निरता त्या सर्व प्रसंगांमधून सुखरूप बाहेर पडल्या.

– सौजन्य (Overman foundation)

*

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### १ जानेवारी २००६

भूतकाळ हा भूतकाळच राहू देत.

तुम्ही तुमचे लक्ष अनादी–अनंतावर केंद्रित करा.

– श्रीमाताजी (CWM 15 : 72)

*

### २१ फेब्रुवारी २००६

स्वतःच्या स्वर्गीय उगमस्रोताची
जाणीव असलेला (तिचा) आत्मा
पृथ्वीच्या अपरिपूर्ण अशा साच्यामध्ये अवतरला
आणि मर्त्यत्वामध्ये येऊन पडला
पण तरीही त्याने शोक केला नाही,
उलट सर्वांवर त्याने त्याच्या
विशाल आणि प्रशांत नयनांनी दृष्टिक्षेप टाकला.
ज्याने आपल्या अंधकाराशी आणि आपल्या वेदनांशी
प्राचीन काळापासून संघर्ष केला होता;
तो विश्वातीत प्रतलांमधून पुन्हा परतला होता
आणि पुन्हा एकदा त्याने मर्त्य श्वासांचे ओझे पेलले होते
तिने पुन्हा एकदा तिचे अपूर्ण राहिलेले दिव्य कार्य हाती घेतले:
युगवर्षांचे दीर्घायुष्य लाभलेली, मृत्युंजय अशी ती,
तिच्या अथांग हृदयानिशी पुन्हा एकदा काळाला सामोरी गेली.

– श्रीअरविंद (CWSA 33-34 : 353)

*